# महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा)

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

महसुल आयुक्त कार्यालयासमोर
आय.एस.पी.रोड,नाशिकरोड, नाशिक-४२२ १०१
फोन: (०२५३) २४६२५१२ / Email- senrtc@gmail.com

जा.क्र.मित्रा/भांडार/ १७८ /२०२३ दिनांक :- ७/९/२०२३

## दरपत्रक सुचना सन २०२३-२४

प्रति,

----------------------------------------------

----------------------------------------------

----------------------------------------------

**विषय : मित्रा प्रशिक्षण संस्थेकरिता ०२ वाहने भाडेतत्वावर लावणेबाबत.**

महोदय,

संचालक, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा), नाशिकरोड, नाशिक या कार्यालयासाठी **दोन वाहने भाडे तत्वावर वार्षिक कालावधीसाठी पुरवठ्यास्तव** दि.२१/०९/२०२३ रोजी ठिक १४.०० वाजेपर्यंत सिलबंद दरपत्रके खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत आहे. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी. दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी १६.०० वाजता उघडण्यात येतील.

दर नमुद करतांना खालील अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचून दर नमुद करण्यात यावे.

**अटी व शर्ती :-**

१) दरपत्रकासोबत पॅनकार्ड, आधार कार्डची प्रत सादर करावी.

२) दरपत्रक सादर करणाऱ्या सेवा पुरवठादाराकडे स्वत:च्या मालकीची व महाराष्ट्रात नोंदविलेले, ०३ Tourist Permit असलेली वाहने असणे बंधनकारक आहे. पुरावा म्हणुन वाहन नोंदणी प्रमाणपत्रांच्या प्रती जोडाव्यात. (टॅक्स पावतीसह). तसेच या व्यतिरिक्त, दुसऱ्या संस्थेची वाहने पुरविणार असल्यास संबंधित संस्थेचे संमतीपत्र असले पाहिजे. पुरावा म्हणून करारपत्र जोडणे आवश्यक राहील.

३) मोटार वाहन कायदा सन १९८८ मधील तरतूदीप्रमाणे सर्व वाहनांची योग्यतावैध असावी व वाहनाचा कॉम्प्रेहेन्सिव्ह विमा असावा.

४) मुंबई मोटार वाहन कार कायद्याप्रमाणे वाहनाचा कर भरलेला असावा.

५) वाहन पांढ-या रंगाचे असावे.

६) वाहनावर LMV-TR परवानाधारक वाहनचालक नेमणे बंधनकारक राहील. त्याची कर्तव्यावर असताना वाहन चालकाची वागणूक शिष्ट संमत असावी. उदा. वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळावे, वागणुक सौज्यन्याची असावी. वाहनचालकाने वाहनाजवळ उपलब्ध असावे वाहन चालकाने दौरा कालावधीत धुम्रपान / गुटखा/ तंबाखु सेवन व मद्यपान पुर्णता टाळावे.

७) यशस्वी दरपत्रक धारकास स्वीकृतीचे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसांत एकुण सुरक्षा अनामत रु.३६,०००/- इतक्या रकमेचा कोणत्याही राष्ट्रीय/शेडयुल बँकेचे सुरक्षा अनामत रक्कमेची मुदत ठेव पावती अधीक्षक अभियंता, मित्रा, नाशिक यांचे नावे काढून जमा करण्यात यावा.

८) सदर वाहनावर परिवहन खाते अथवा पोलीस खाते यांचे दंडात्मक चलन प्रलंबित नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, दरपत्रक सादर करण्याऱ्या अभिकरणाच्या लेटरहेडवर सादर करावे.

९) नोंदणी प्रमाणपत्र – शॉप ऍन्ड इस्टाब्लीशमेंट ऍक्ट्खाली नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

१०) वाहन परिवहन कार्यालयातर्फे वैध नोंदणीकृत व नुतनीकरण झालेले असणे आवश्यक आहे. (कर व विमा ग्राह्य असावा)

११) इंधनाचा खर्च वाहनाच्या मालकाने करावयाचा आहे.

१२) दर महिन्याचा २५०० कि.मी. वापर गृहीत धरुन प्रति कि.मी.चे दर देण्यात यावे व त्यापुढील कि.मी.साठी काय दर राहतील ते नमुद करण्यात यावे.

१३) यशस्वी अभिकरणास दर महिन्याला किमान २५०० कि.मी. साठीचे देयक अदा करण्यात येईल. तसेच वाहनाची २५०० कि.मी. पेक्षा जास्त धाव झाल्यास, २५०० कि.मी. व त्यापुढील कि.मी.साठीचे देयक अदा करण्यात येईल.

१४) यशस्वी अभिकरणाने लॉगबुक ठेवणे गरजेचे असून, लॉगबुक या कार्यालयामार्फत पुरविण्यात येईल.

१५) वाहनासाठी चालक हा मालकाने नियुक्त केलेला असावा. वाहनचा वापर आवश्यकतेनुसार उशिरापर्यंत करावा लागल्यास अतिकालिन भत्ता देणे किंवा पर्यायी वाहन चालक पुरविण्याची जबाबदारी वाहन मालकाकडे असेल.

१६) सध्या कार्यालयासाठी जरी ०२ वाहनांची आवश्यकता असली, तरी एखाद्या वाहनाची आवश्यकता नसल्यास, सदरचे वाहन कुठलेली कारण न देता कुठलीही नुकसान भरपाई न देता, बंद करण्यात येईल. याबाबतचे अधिकार संचालक (प्रशासन), मित्रा, नाशिक राखून ठेवत आहेत.

१७) कोणताही दुरुस्ती खर्च या कार्यालयाकडून अदा केला जाणार नाही.

१८) वाहन कराबाबत (टॅक्स) व विमा इत्यादी बाबत वाहन पुरविण्याची जबाबदारी वाहन मालकावर राहील.

१९) वापरात असलेले वाहन ना-दुरुस्त झाल्यास पर्यायी वाहन पुरविण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

२०) वाहनास अपघात झाल्यास नुकसान भरपाई इत्यादीबाबत जबाबदारी वाहन मालकाची राहील. या संदर्भात उद्‌भवणाऱ्या कायदेशीर बाबी संबंधी वाहन मालक पुर्णत: जबाबदार राहील.

२१) वाहनचालकाने केलेल्या नियम बाह्य वर्तनाची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

२२) पुरविण्यात येणाऱ्या वाहनाची नोंदणी दि.०१ जानेवारी २०१८ पुर्वीची नसावी.

२३) वाहन करारनामा केल्यानंतर सदर वाहन दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी वापरण्यासाठी देता येणार नाही, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कामे संपल्यानंतर व सुट्टीच्या दिवशी वाहन कार्यालयात ठेवणे आवश्यक राहील.

२४) सदर भाडे करार हा कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी अंमलात राहील. तथापि, सदर भाडे करार कुठलेली कारण न देता कुठलीही नुकसान भरपाई न देता मुदतपुर्व संपुष्टात आण्याचे अधिकार संचालक (प्रशासन), मित्रा, नाशिक यांना राहतील. कार्यालयास शासकीय वाहन उपलब्ध झाल्यास नुकसान भरपाई न देता करार एकतर्फी संपुष्टात आणण्यात येईल.

२५) बेकायदेशीरपणे विध्वसंक साहित्याची वाहतुक, करारनामा केलेल्या वाहनातून करण्यात येऊ नये. त्यामुळे उद्‌भवणाऱ्या कायदेशीर बाबीस मित्रा कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२६) भाडेतत्वावरील वाहनाच्या कामाच्या बाबतीत वेळेचे बंधन राहणार नाही. शासकीय सुट्टी (प्रत्येक शनिवार / रविवार व इतर शासकीय सुट्टया) जरी असेल व तातडीचे कामासाठी जाणे आवश्यक असल्यास वाहन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. अशा वेळी वाहन उपलब्ध न झाल्यास खात्याने वापरलेल्या गाडीचे भाडे देयकातून वसूल करुन घेण्यात येईल.

२७) पथकर (Toll) व Parking Charges हे प्रत्यक्ष सेवापुरवठादाराने भरल्यानंतर, अदा करण्यात आलेल्या रक्कमेच्या पावत्या (पुरावा) कार्यालयात जमा केल्यानंतर त्या रक्कमेचा परतावा करण्यात येईल.

२८) अभिकरण निश्चितीनंतर रु.५००/- च्या स्टँप पेपरवर लेखी करारनामा करण्यात येईल.

२९) कोणत्याही वादविवादाबाबत संचालक, मित्रा, नाशिक यांनी घेतलेला निर्णय अंतिम व मालकावर बंधनकारक राहील.

३०) दर नमुद करतांना सर्व करांसह आणि जीएसटीसह सादर करावेत.

३१) एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

**सोबत** : दरपत्रकाचा मसुदा

**(श्रीमती एस.बी.नरवाडे)**
**संचालक (प्रशासन)**
मित्रा, नाशिक

**प्रत** : सुचना फलक, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा), नाशिक.

# (वाहन पुरवठा करणाऱ्या संस्थेचे लेटरहेडवर)

## दरपत्रक

**संदर्भ** : मित्रा संस्थेची जा.क्र. मित्रा/भांडार/ ९७९, दि. ७/०९/२०२३ ची दरपत्रक सुचना.

दरपत्रक सुचनेमधील अटी व शर्तींचे अधीन राहून, खालील नमुद वाहनासाठी माहेवारी एकूण मर्यादा २५०० कि.मी. प्रतिमाह तत्वावर दर नमूद करीत आहे.

| अ.क्र. | तपशिल | दर माहेवारी, मर्यादा २५०० कि.मी. पर्यंत रुपये |
|---|---|---|
| १ | Maruti Swift Dzire / Hyundai Accent, AURA / Tata Zest / Honda Amaze / Toyota Etios / Mahindra Verito यापैकी पांढऱ्या रंगाचे व Tourist Permit असलेले वाहन सोबत जोडलेल्या अटी शर्तींनुसार | |
| २ | वरीलप्रमाणे वाहन पुढील २५०० कि.मी. मर्यादेनंतर पुढील कि.मी.साठी प्रति कि.मी. दर | |

**टिप** :- १) वरील दर हे सर्व करांसह आहेत.

२) महिन्याचे शेवटी लॉगबुकच्या प्रती व देयक सादर केल्यानंतर धनादेशाद्वारे अदायगी करण्यात येईल.

३) नियमानुसार देयकातून शासकीय वजाती वसूल करण्यात येतील.

**पुरवठादाराचा सही व शिक्का**